असा. क्र. ४१ रजिस्टर्ड नं. एमएच/एमआर/साऊथ-२२९/२००६-०८

# महाराष्ट्र शासन राजपत्र

**असाधारण**

**प्राधिकृत प्रकाशन**

**सोमवार, डिसेंबर १०, २००७/अग्रहायण १९, शके १९२९**

**स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.**

## भाग चार

**महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम**

**अनुक्रमणिका**

| | पृष्ठे |
|---|---|
| **सन २००७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३१.**—महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० यात आणखी सुधारणा करण्यासाठी अधिनियम. | ३०५-३०६ |

दिनांक ७ डिसेंबर २००७ रोजी मा. राज्यपालांनी संमती दिलेला महाराष्ट्र विधानमंडळाचा पुढील अधिनियम माहितीसाठी, याद्वारे, प्रसिद्ध करण्यात येत आहे.

**अ. मा. शिंदेकर,**
सचिव,
महाराष्ट्र शासन,
विधी व न्याय विभाग.

---

### सन २००७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३१.

(मा. राज्यपालांची संमती मिळाल्यानंतर ‘ **महाराष्ट्र शासन राजपत्रात** ’ दिनांक १० डिसेंबर २००७ रोजी प्रथम प्रसिद्ध केलेला अधिनियम.)

### महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० यात आणखी सुधारणा करण्यासाठी अधिनियम.

सन १९६१ चा महा. २४. **ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांसाठी, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० यात आणखी सुधारणा करणे इष्ट आहे ; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या अठ्ठावन्नाव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

**१.** या अधिनियमास, महाराष्ट्र सहकारी संस्था (तिसरी सुधारणा) अधिनियम, २००७ असे म्हणावे. संक्षिप्त नाव.

सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २४ याच्या कलम ७३च ची सुधारणा.

२. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० (यात यापुढे ज्याचा निर्देश " मुख्य अधिनियम " असा करण्यात आला आहे) याच्या कलम ७३च ला त्याचे पोट-कलम (१) असा नवीन क्रमांक देण्यात येईल, आणि,— सन १९६१ चा महा.२४.

(क) अशा प्रकारे नवीन क्रमांक देण्यात आलेल्या पोट-कलम (१) मध्ये,—

(एक) " जो सदस्य किंवा ज्यांचा निकटचा नातेवाईक " या मजकुराने सुरू होणाऱ्या व " संस्थेचा भागीदार असेल " या मजकुराने संपणाऱ्या मजकुराऐवजी " संस्थेच्या कार्यक्षेत्रात जो सदस्य अशा मालाचा विक्रेता असेल किंवा अशा मालाचा धंदा करणाऱ्या कंपनीचा संचालक किंवा अशा भागीदारी संस्थेचा भागीदार असेल, " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(दोन) स्पष्टीकरण वगळण्यात येईल ;

(ख) अशा प्रकारे नवीन क्रमांक देण्यात आलेल्या पोट-कलम (१) नंतर, पुढील पोट-कलम जादा दाखल करण्यात येईल :—

" (२) संस्था जो धंदा चालवीत असेल तो धंदा संस्थेच्या कार्यक्षेत्राबाहेर चालवण्याची इच्छा असलेल्या कोणत्याही सदस्यास, असा धंदा चालविण्यासाठी परवानगी मिळवण्याकरिता संस्थेकडे अर्ज करता येईल. संस्थेस, विहित करण्यात येतील अशा शर्तीना अधीन राहून, अशी परवानगी देता येईल. " ; आणि

(ग) समासटिपेमध्ये, " किंवा ज्यांचा निकटचा नातेवाईक करतो " हा मजकूर वगळण्यात येईल.

सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २४ याच्या कलम ७३चच ची सुधारणा.

३. मुख्य अधिनियमाच्या कलम ७३ चच मध्ये, पोट-कलम (१) च्या खंड (पाच) ऐवजी पुढील खंड दाखल करण्यात येईल :—

" (पाच) संस्था जो धंदा चालवीत असेल तो धंदा, एकतर संस्थेच्या कार्यक्षेत्रात चालवीत असेल किंवा कलम ७३च च्या पोट-कलम (२) च्या तरतुदींचे उल्लंघन करून चालवीत असेल ; किंवा ".

सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २४ याच्या कलम १६५ ची सुधारणा.

४. मुख्य अधिनियमाच्या कलम १६५ मध्ये, पोट-कलम (२) मधील, खंड (पस्तीस-ड) नंतर पुढील खंड समाविष्ट करण्यात येईल :—

" (पस्तीस-ड-१) संस्था जो धंदा चालवीत असेल तो धंदा संस्थेच्या कार्यक्षेत्राबाहेर चालवण्यासाठी एखाद्या सदस्याला संस्था ७३च(२) अन्वये ज्या शर्तीवर परवानगी देईल त्या शर्ती विहित करणे ; ".

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.

असा. क्र. १ रजिस्टर्ड नं. एमएच/एमआर/साऊथ-२२९/२००६-०८

# महाराष्ट्र शासन राजपत्र

**असाधारण**

**प्राधिकृत प्रकाशन**

**मंगळवार, जानेवारी १, २००८/पौष ११, शके १९२९**

**स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.**

## भाग चार

**महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम**

### शुद्धिपत्र

**महाराष्ट्र शासन राजपत्र,** भाग चार, असाधारण, दिनांक १० डिसेंबर २००७ च्या पृष्ठ ३०५ ते ३०६ वर प्रसिद्ध झालेल्या महाराष्ट्र सहकारी संस्था (तिसरी सुधारणा) अधिनियम, २००७ (सन २००७ चा महा. ३१) च्या कलम ४ मध्ये " संस्था ७३ च (२) " **ऐवजी** " संस्था कलम ७३ च (२) " **वाचावे.**



शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई

असा. क्र. ८३

रजिस्टर्ड नं. एमएच/एमआर/साऊथ-२२९/२००६-०८

# महाराष्ट्र शासन राजपत्र

असाधारण

प्राधिकृत प्रकाशन

सोमवार, डिसेंबर १०, २००७/अग्रहायण १९, शके १९२९

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

## भाग आठ

महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम आणि विधी व न्याय विभागाकडून आलेली विधेयके (इंग्रजी अनुवाद).

In pursuance of clause (3) of article 348 of the Constitution of India, the following translation in English of the Maharashtra Co-operative Societies (Third Amendment) Act, 2007 (Mah. Act No. XXXI of 2007), is hereby published under the authority of the Governor.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

A. M. SHINDEKAR,
Secretary to Government,
Law and Judiciary Department.

---

## MAHARASHTRA ACT No. XXXI OF 2007.

(First published, after having received the assent of the Governor, in the "*Maharashtra Government Gazette*", on the 10th December 2007).

An Act further to amend the Maharashtra Co-operative Societies Act, 1960.

Mah. XXIV of 1961. WHEREAS, it is expedient further to amend the Maharashtra Co-operative Societies Act, 1960, for the purposes hereinafter appearing ; It is hereby enacted in the Fifty-eighth year of the Republic of India as follows :—

**1.** This Act may be called the Maharashtra Co-operative Societies (Third Amendment) Act, 2007. Short title.



[किंमत : रुपये ९.००]

Amendment of section 73F of Mah. XXIV of 1961.

**2.** Section 73F of the Maharashtra Co-operative Societies Act, 1960 (hereinafter referred to as "the principal Act"), shall be re-numbered as sub-section *(1)* thereof ; and,— Mah. XXIV of 1961.

(*a*) in sub-section *(1)* as so re-numbered,—

*(i)* for the words "who or whose near relation is a dealer in such goods or is a director of a company or a partner in a firm carrying on business in such goods", the words "who is a dealer in such goods or is a director of a company or a partner in a firm carrying on business in such goods, in the area of operation of the society" shall be substituted;

*(ii)* the Explanation shall be deleted;

*(b)* after sub-section *(1)* as so re-numbered, the following sub-section shall be added, namely :—

"*(2)* Any member who desires to carry on the business of the kind carried on by the society outside the area of operation of the society may apply to the society for permission to carry on such business. The society may grant such permission subject to such conditions as may be prescribed."; and

*(c)* in the marginal note, the words "or whose near relation" shall be deleted.

Amendment of section 73FF of Mah. XXIV of 1961.

**3.** In section 73-FF of the principal Act, in sub-section *(1)*, for clause *(v)*, the following clause shall be substituted, namely :—

"*(v)* carries on business of the kind carried on by the society either in the area of operation of the society or in contravention of the provisions of sub-section *(2)* of section 73F ; or ".

Amendment of section 165 of Mah. XXIV of 1961.

**4.** In section 165 of the principal Act, in sub-section *(2)*, after clause *(xxxv-d)*, the following clause shall be inserted, namely :—

"*(xxxv-d-1)* prescribe the conditions, on which the society may grant permission to a member to carry on the business of the kind carried on by it, outside its area of operation, under section 73F *(2)* ; ".

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई